# छत्रपती राजर्षी शाहू महाराजांची राष्ट्र उभारणीत भूमिका

संपादक

**प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे**



राजवैभव थोर असेल,
पण मी रयतेशी
वचनबद्ध आहे.
ती वचनबद्धता
त्या वैभवाहूनही
थोर आहे.

– राजर्षी शाहू महाराज

छत्रपती राजर्षी शाहू महाराजांची राष्ट्र उभारणीत भूमिका

संपादक
प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे

अरुणा प्रकाशन, लातूर
१०३, ओंकार कॉम्प्लेक्स - अ, खर्डेकर स्टॉप, औसा रोड,
लातूर - ४१३५१२ मो. ९४२१४८६९३५

ISBN 978-93-91689-21-6

# अनुक्रमणिका

१. राजर्षी शाहू महाराजांचा एक कुशल व्यवस्थापक म्हणून अभ्यास
प्रा. डॉ. हेमंत अनिल जोशी ........................................ १५

२. सामाजिक लोकशाहीचे आधारस्तंभ : राजर्षी शाहू महाराज
डॉ. रेखा रामनाथ बने ........................................ २३

३. भारतातील सामाजिक कायद्यांचे जनक : राजर्षी शाहू
डॉ. राजशेखर सोलापुरे ........................................ २९

४. छत्रपती शाहू महाराजांच्या विचारांची प्रस्तुतता
डॉ. हनुमंत फाटक ........................................ ३९

५. शैक्षणिक सुधारणांमधील छत्रपती राजर्षी शाहू महाराज
प्रा. डॉ. पाटील अभिजित सुशीलकुमार ........................ ४३

६. सामाजिक लोकशाहीचे अग्रदूत : राजर्षी शाहू महाराज
प्रा. ज्ञानेश्वर बनसोडे, प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे .............. ५२

७. शैक्षणिक सुधारणांमधील छत्रपती राजर्षी शाहू महाराजांची भूमिका
डॉ.गुंफा पाटीलबा कोकाटे ........................................ ५८

८. राजर्षी छत्रपती शाहू महाराजांचे सामाजिक योगदान
प्रा.डॉ. कालिदास फड ........................................ ६३

९. छत्रपती शाहू महाराज आणि सत्यशोधक पत्रकार : अनुबंध
डॉ. गोविंद काळे ........................................ ७०

१०. छत्रपती राजर्षी शाहू महाराज आणि आरक्षण धोरण
डॉ. दिलीपकुमार दगडू क्षीरसागर ................................ ७७

११. राजर्षी शाहु महाराजांचे सामाजिक समता व सामाजिक न्याय प्रस्थापनेतील योगदान
प्रा. डॉ. कदम एच.पी. ........................................ ८३

Scanned by CamScanner

# ६

# सामाजिक लोकशाहीचे अग्रदूत : राजर्षी शाहू महाराज

□□□

प्रा. ज्ञानेश्वर बनसोडे, प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे

राजर्षी शाहू महाराज हे कोल्हापूर संस्थानाचे प्रमुख होते. त्याकाळी भारतात अनेक संस्थाने होती. परंतु सर्व संस्थाने लोककल्याणचा विचार करतच होती असे म्हणता येत नाही. कारण राजेशाही ही लोककल्याणाचा सहसा विचार करत नाही. हा आजपर्यंतचा जगाचा इतिहास आहे. परंतु राजर्षी शाहू महाराज याला अपवाद होते. त्यांचे राज्य हे कल्याणकारी होते. या राजाने आपली सत्ता केवळ लोककल्याणाच्या हेतूनेच उपयोगात आणली. गडकऱ्यांच्या राजसंन्यास नाटकातले एक विधान अर्थपूर्ण आहे. "राजा म्हणजे राज्याचा उपयोगशून्य स्वामी आणि राज्यउपभोग म्हणजे राजसंन्यास." या विधानातून राजर्षी शाहू महाराजांचे जीवन आणि कार्य प्रकट झाले आहे. असे म्हणण्यास हरकत नाही. वैयक्तिक सुखात ते कधी गुरफटून गेले नाहीत. सर्वसामान्य माणसाच्या प्रगतीचा व सुखाचा त्यांनी सदैव विचार केला. सामान्य माणुस जो नानाप्रकारच्या साखळदंडानी बांधला गेला आहे. ज्याच्या आयुष्यात नवविचाराची आणि सुखाची पहाट कधीच उगवली नाही, तो शोषित, वंचित माणूस समर्थ व्हावा, सुशिक्षित व्हावा यासाठी शाहू महाराजांनी ज्या योजना आखल्या, जे परिश्रम केले ते नव्या इतिहासाला चालना देणारे ठरले. करवीर संस्थानातील प्रजा जेवढी राजनिष्ठ होती, तेवढाच त्यांचा राजा लोकनिष्ठ होता. राजर्षी शाहू महाराजांचे अलोट प्रेम आपल्या जनतेवर होते. केवळ प्रजापालन हा राजधर्म असतो असे नाही, तर आपल्या प्रजेच्या पारंपारिक जीवनदृष्टीत परिवर्तन व्हावे आणि सर्वसामान्य माणसाला शोषणमुक्त जीवन जगण्याची संधी ही त्यांची मुळची भूमिका होती. सहसा लोकासधन करण्यात आपला धर्म सामावला आहे असा राज्यकर्त्या वर्गाचा समज असतो. भौतिकदृष्ट्या प्रजा सुखी, आनंदी झाली पाहिजे. आपले कर्तव्य संपले या समजुतीच्या पलीकडे गेलेले फारच थोडे राजे इतिहासात आढळतात. छत्रपती शिवाजी महाराजांचा आदर्श समोर असलेल्या शाहू महाराजांनी केवळ लोकपालन इतकिच आपली सीमा कधीच मानली नाही. म्हणूनच शाहूशाही ही



Scanned by CamScanner

देखील शिवशाहीइतकीच आदर्श होती.

लोकशाही शासन हे कल्याणकारी शासन असते तसे राजेशाही शासन असत नाही. राजाला कायदे निर्माण करण्याचे, त्यांची अंमलबजावणी करण्याचे आणि त्याप्रमाणे न्याय देण्याचे सर्व अधिकार असतात. राजाज्ञा हाच कायदा असतो. त्याच्या आदेशाचे पालन प्रजा करत असते. त्याच्या इशाऱ्यावरच शासन चालते. तोच राज्याचा प्रमुख असतो. राजा हाच विधिमंडळ, कार्यकारीमंडळ आणि न्यामंडळ असतो. हया सर्व शक्ती त्याच्या एकटयाच्या हातात केंद्रित झालेल्या असतात. वंशपरंपरेने तो सत्ताधारी असतो. त्याला बदलण्याचा अधिकार प्रजेच्या हातात नसतो.

खरे तर राजा हा आपल्या प्रजेचा पिता मानला जातो. पित्याचे आपल्या अपत्यांवर जेवढे प्रेम असते. तेवढेच प्रेम राजाचे आपल्या प्रजेवर असते. असे गृहित धरले जाते. या गृहितकावरच राजधर्म आधारलेला असतो. राजाने राजधर्म पाळला तर ते राज्य हे कल्याणकारी राज्य बनू शकते. पण हा राजधर्म पाळणारे राजे इतिहासात फार कमी झालेले आहेत. शाहू माहराजांना समकालीन असणारे आणि त्यांच्या पुर्वीचेही अनेक संस्थानिक सत्तेचा सर्वार्थांनी स्वैर आणि बेजबाबदार उपभोग घेत होते. प्रजेच्या संपत्तीवर चरावे, परदेशात वाऱ्या कराव्यात आणि सत्तेची वारुणी पिऊन धुंद व्हावे, या पलीकडे त्यांना कर्तव्याची जाण नव्हती. आत्मभान आणि अभिमान नसलेल्या अनेक संस्थानिकांनी आपल्याच प्रजेचे शोषण मात्र केले. शासक हा न्यायी असेल तरच तो आपल्या प्रजेला खरा न्याय देऊ शकेल अन्यथा नाही. प्रजाहित हेच त्याच्या राजकारभाराचे उद्दिष्ट असेल तर तो कल्याणकारी काम करु शकतो. शाहू महाराज हे त्यापैकीच एक होते. त्यांचे राज्य हे लोकांचे व लोकांसाठीच होते. हा राज्यकर्ताच प्रजानिष्ठ असल्यामुळे त्याची प्रजाही राज्यनिष्ठ होती.

**१) न्यायाधिष्ठित राज्य :**

जनतेच्या हिताचे रक्षण आणि जगण्याचे साधन यांची खात्री हे कल्याणकारी राज्याच्या प्राथमिक गोष्टी असतात. कायद्याचे राज्य आणि कायद्यासमोर समानता याचा आशय तर खरा हाच आहे. राज्यकर्त्याला सगळे नागरिक समान असतात. आपल्या राज्यात कायदा आणि सुव्यवस्था राखणे हे राज्यकर्त्यांचे प्रथम कर्तव्य असते. राजर्षी शाहू महाराजांमध्येही प्रज्ञा, करुणा, न्यायप्रियता व सहानुभूती हे गुण होते. म्हणून न्यायावर आधारलेले कल्याणकारी कायदे त्यांनी केले आणि ते यशस्वीपणे राबवलेही सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचा कायदा-१९१७, आतरजातीय व आंतरधर्मिय विवाह कायदा-१९१९, ५० टक्के आरक्षणाचा जाहीरनामा-१९०२, अनौरस संतती कायदा-१९२०



Scanned by CamScanner

शाहू महाराजांचे सर्व जाहीरनामे, हुकूमनामे व कायदे कल्याणकारी होते. मागासलेल्या दुर्बल लोकांना सामाजिक सुधारणेच्या प्रवाहात आणण्याचे काम त्यांनी कायद्यांच्या माध्यमातून केले. त्यांचे राज्य हे न्यायाधिष्ठत, कल्याणकारी कायद्याचे राज्य होते आणि कायद्यासमोर सर्व समान होते.

## २) सार्वत्रिक शिक्षणाचा प्रसार :

शिक्षण ही सर्व प्रगतीची जननी आहे. समाजातील सर्व घटकांपर्यंत शिक्षण पोहचणे अत्यंत गरजेचे आहे. हे शाहू महाराजांनी जाणले होते. पिढयान-पिढयांपासून शिक्षणाला मुकल्यामुळे या देशातील बहुसंख्य लोक दैववादाच्या दाढेत आणि दारिद्रयाच्या दरीत सापडले आहेत. ही वास्तुस्थिती त्यांनी लक्षात घेतली. शिक्षणाच्या अभावामुळेच बहुजन समाजाची मती, नीती आणि गती गेली आणि वितही गेले. असे महात्मा फुलेंनी म्हटले आहे. शाहू महाराजांनीही मागासलेल्या सर्व जातीतील विद्यार्थ्यांच्या शिक्षणात जातीने लक्ष घातले. निरनिराळया जातींतील विद्यार्थ्यांसाठी त्यांनी वसतिगृहे बांधली. त्यांना अभिप्रेत असलेल्या समाज परिवर्तनाचे साधन म्हणजे शिक्षणाचा प्रसार. शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही. शिक्षणाशिवाय कुठलाही व्यक्ती, समाज किंवा कुठलेही राष्ट्र प्रगती करू शकलेले नाही. करू शकत नाही आणि म्हणूनच शिक्षणाच्या सोयी प्राप्त करून देणे ही राज्याची जबाबदारी आहे. हे तत्त्व जगातील राष्ट्रांनी मान्य केलेले होते. शिक्षणाशिवाय कोणत्याही देशाची उन्नती झाली नाही असे इतिहास सांगतो. म्हणून शाहू महाराजांनी मोफत व सक्तीच्या शिक्षणाची योजना आखली.

गाव तेथे शाळा ही संकल्पना शाहू महाराजांची होती. म्हणूनच त्यांनी २१ सप्टेंबर १९१७ रोजी सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचा कायदा केला. पहिली शाळा चिखली येथे ४ मार्च १९१८ रोजी काढली. अशा एकूण २७ शाळा सुरु केल्या. त्या शाळांमध्ये आपल्या मुलांना पाठवण्याची सक्ती पालकांवर करणे आवश्यक होते. शिक्षणाची दारे सर्वांना खुली करणे तर आवश्यक होतेच त्या दारांच्या आत सर्व थरातील मुलांना सक्तीने ढकलने आवश्यक होते. यासाठी राजर्षी शाहू महाराजांनी सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचा कायदा केला. सर्वांसाठी शिक्षण हेच तत्त्व या कायद्यामागे उभे होते. या शाळेत प्रवेश देताना स्पृश्य-अस्पृश्य असा भेदभाव न करता सर्वांना समान शिक्षणाची व्यवस्था होती. शिक्षण हेच समाजपरिवर्तनाचे मुख्य साधन आहे. शिक्षणाशिवाय समाज पुर्णपणे व सर्वांगाणी विकसित होऊ शकत नाही. उत्तम नागरिक निर्माण करणे शिक्षणाचे ध्येय असले पाहिजे असे त्यांचे मत होते.



Scanned by CamScanner

### ३) समताधिष्ठित समाज :

समाजसुधारणा हे गतिशील व पुरोगामी समाजाचे लक्षण आहे. समाजातील अनिष्ठ प्रथा-परंपरा, सामाजिक चालीरिती, रुढी,जातीभेद, उच्चनिच्चता इत्यादी दूर करण्याकरीता समाजात अनेकांनी प्रयत्न केले. राजर्षी शाहू महाराजांनी आपल्या शैक्षणिक, सामाजिक व आर्थिक कार्याद्वारे बहुजन समाजाला जागृत करून त्यांची सर्वांगीण प्रगती घडवून आणण्याचा प्रयत्न केला. कोणी उच्च नाही, कोणी नीच नाही. सर्वांचे माणूसपण एकाच पातळीवरचे आहे हा विचार प्रत्यक्षात रुजवण्यासाठी त्यांनी केलेले प्रयत्न 'न भूतो' या कोटीतले आहेत. अस्पृश्य समजल्या जाणाऱ्या आणि सदैव माणुसकीच्या अधिकारापासून वंचित राहिलेल्या समाजाच्या विकासासाठी त्यांनी सदैव लढा दिला. अस्पृश्यता हा भारतातील उच्च-नीच स्वरूपाच्या जाती व्यवस्थेतून जन्माला आलेला एक महाभयंकर प्रकार आहे म्हणून जाती-जातीची ही उतरंड मोडली पाहिजे व जातीभेदाचा हा विषवृक्ष मुळासकट उपटून काढला पाहिजे. अशीच भूमिका शाहू महाराजांची होती. अस्पृश्यता हे याच जातिव्यवस्थेच्या समाजवृक्षाला आलेले महाभयंकर विषारी फळ आहे. सामाजिक ऐक्य नष्ट करणारा जातीभेद संपवून समाताधिष्ठित समाजाची निर्मिती करण्याचे कार्य शाहू महाराजांनी केले. महाराज स्वतः महार, मांग, चांभार, ढोर या जमातितल्या लोकांना आपल्या पंक्तीला घेऊन भोजन करत असत त्यांना सामाजिक प्रतिष्ठा मिळावी म्हणून प्रतिष्ठित व्यावसाय करण्यासाठी त्यांना संधी मिळवून देत. आपल्या राजवाड्यावर त्यांनी अनेक सेवक या वर्गातूनच नेमले होते. या समाजातील सुशिक्षित लोकांना त्यांनी वकिलीच्या सनदा दिल्या. अस्पृश्यांच्या शिक्षणाची आणि त्यांना अधिकाधिक चांगल्या नोकऱ्या मिळवून देण्याची महाराजांनी केलेली कामगिरी अभूतपूर्वच आहे.

### ४) स्त्री पुरुष समानता :

भारतीय समाज वर्णावर, जातीवर उभा आहे. पुरुषप्रधान संस्कृतीचा तो समर्थक आहे. ही व्यवस्थाच मुळात विषमता निर्माण करणारी, विषमतेचे समर्थन करणारी आहे. या व्यवस्थेत महिलांना प्रतिष्ठा नसतेच. त्यांना हक्क प्राप्त करून देण्यासाठी अनेक कायदे करण्यात आले पण सर्वच कायदे त्यांच्यापर्यंत पोहचतात असे नाही. सध्या हुंडाबंदीचा कायदा आहे, पण हुडयांची पध्दत सर्रास चालू आहे. बालविवाह प्रतिबंधक कायदा आहे. पण बालविवाह मोठयाप्रमाणात होतात. कायदाचा वचक नसल्याने आणि कायदा राबवणारी यंत्रणा बेजबाबदार असल्याने कायदा आंधळा-पांगळा बनतो. असे कायदे संस्थेने कितीही केले तरी त्याचा परिमान शुण्य होतो आणि



Scanned by CamScanner

स्त्रियांवरील अन्याय वाढत राहतो. याकडे दुर्लक्ष करणाऱ्या समाजाने त्यांना शिक्षण बहाल केले. समाजकल्याण, समाजपरिवर्तन आणि सामाजिक मूल्यांचे संवर्धन करण्यासाठी स्त्रियांना अशा परंपरेच्या जोखडातून मुक्त करावे लागेल, हा विचार राजर्षी शाहू महाराजांनी तेव्हा केला, म्हणूनच त्यांनी महिलाविषयक कायदे संमत केले. जुलै १९१९ मध्ये त्यांनी विधवा पुनर्विवाह कायदा संमत केला. १२ जुलै १९१९ मध्ये आंतरजातीय विवाह कायदा कोल्हापूर गॅझेटमध्ये प्रसिध्द केला. राजर्षी शाहू महाराजांचे सर्व कायदे हे कल्याणकारी होते. स्त्री-पुरुष समानता निर्माण करणे हाच त्यांचा केलेला उद्देश होता.

**५) आरक्षणाची तरतुद :**

समताधिष्ठित समाजनिर्मिती हे लोकशाही व्यवस्थेचे प्रमुख लक्षण असते. राजर्षी शाहू महाराज सामाजिक समतेचे पुरस्कर्ते होते. सर्वसामान्य जनतेला न्याय मिळवून देण्यासाठी तसेच दलित समाजाच्या सामाजिक परिवर्तनाला गती देण्याचे कार्य राजर्षी शाहू महाराजांनी केले. मागासलेल्या वर्गांना प्रगतीच्या प्रवाहात आणण्यासाठी राखीव जागांची तरतूद केली. ५० टक्के आरक्षण देण्याचा क्रांतीकारण निर्णय घेऊन २६ जुलै १९०२ पासून त्यांची अंमलबजावणी केली आरक्षणाबाबतचा हा जाहीरनामा करवीर गॅझेटमूधन प्रसिध्द करण्यात आला. ते आधुनिक काळातील एकमेव असे राजे आहेत. ज्यांनी ब्राम्हणोत्तरासाठी ५० टक्के आरक्षण दिले. हा निर्णय एक प्रकारचा सामाजिक स्फोटच होता. आरक्षणाच्या या तत्त्वावरच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी पुढे अनुसुचित जाती व अनुसुचित जमातीसाठी संविधानात तरतूद केली. म्हणून शाहू महाराज खऱ्या अर्थाने आरक्षणाचे जनक ठरतात.

**समारोप :**

समाजपरिवर्तनाच्या सर्व प्रक्रियेत राजर्षी शाहू महाराजांनी केलेल्या कार्याचे महत्त्व अनन्यसाधरण असेच आहे. महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केलेल्या कार्याची व्याप्ती ही व्यक्ती आणि समाजापुरती मर्यादित होती. शाहू महाराजांनी ती राजपदापर्यंत पोहचवली हे त्यांचे कार्य निश्चितच क्रांतीकारी आहे. शाहू महाराजांच्या कार्याचे विवेचन करताना धनंजय कीर असे म्हणतात की, सत्तेचा उपयोग लोकोध्दारासाठी करायचा असतो हे तत्त्व प्रतिपादन करणारे शाहू महाराज आदर्श राज्यकर्ते होते. तसेच नवयुगाच्या आगमनाची घोषणा करणारे आग्रदूत होते. त्यांनी केलेल्या कार्यामुळे सामाजिक लोकशाहीचे आधारस्तंभ असे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची केलेले विधान हे समर्थक ठरते.



Scanned by CamScanner

संदर्भ :

१. डॉ. जयसिंगराव पवार (संपा.), राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ, महाराष्ट्र इतिहास प्रबोधनी, कोल्हापूर, २००७
२. ए. के. घोरपडे, राजर्षी शाहू छत्रपती चरित्र व कार्य, अनुरूप प्रिंटर्स अँड पब्लिशर्स प्रा. लि. पुणे, १९९८
३. कीर धनंजय, राजर्षी शाहू छत्रपती-एक समाक्रांतिकारक राजा, मुंबई, १९७९
४. डॉ. रमेश जाधव (संपा.), राजर्षी शाहू गौरव ग्रंथ, महाराष्ट्र शासन, राजर्षी शाहू चरित्र साधने प्रकाशन समिती मंत्रालय, मुंबई, २०१६
५. डॉ. दुष्यंत कटारे (संपा.), लोकराजा राजर्षी, युगप्रर्वतक प्रकाशन, लातूर, २०१८
६. डॉ. जयसिंगराव पवार, राजर्षी शाहू छत्रपती जीवन व कार्य, महाराष्ट्र इतिहास प्रबोधनी, कोल्हापूर, २०१२
७. साळुंखे पी.बी., (संपा.), राजर्षी शाहू महाराज गौरव ग्रंथ, महाराष्ट्र राज्य शिक्षण विभाग, सचिवालय, मुंबई, १९७६.

**प्रा. ज्ञानेश्वर बनसोडे**
पदवी व पदव्युत्तर राज्यशास्त्र विभाग,
राजर्षी शाहू महाविद्यालय
(स्वायत्त), लातूर

**डॉ. महादेव गव्हाणे**
प्राचार्य,
राजर्षी शाहू महाविद्यालय
(स्वायत्त), लातूर

OOO



Scanned by CamScanner